www.prepp.in

Your Personal Exams Guide

Test Booklet Code & Serial No.
प्रश्नपत्रिका कोड व क्रमांक

**A**

# ECONOMICS
## Paper-III

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ..........................................

(Name) ................................................

2. (Signature) ..........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ..............................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

**APR - 11317**

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

### Instructions for the Candidates

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   - (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   - (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/ questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   - (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत 75 बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी अवश्य तपासून पहाव्यात.
   - (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   - (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   - (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहिलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**

www.prepp.in

Your Personal Exams Guide

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



# ECONOMICS
## Paper III
# अर्थशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Question Paper contains **Seventy Five (75)** multiple choice questions. Each question carries **Two (2)** marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर (75)** बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन (2)** गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Indirect least squares procedure of estimation is appropriate when simultaneous equations are :
   (A) Over-identified
   (B) Under-identified
   (C) Exactly-identified
   (D) Not identified

2. The method used to analyse the stochastic properties of economic time series on their own is known as :
   (A) Exponential smoothing method
   (B) Single-equation regression model
   (C) ARIMA model
   (D) VAR model

1. प्राक्कलनाची अप्रत्यक्ष लघुत्तम वर्ग प्रक्रिया ही सुयोग्य असते जेंव्हा एकसामयिक समीकरणे ........................ असतात.
   (A) अति ओळख पटवलेले
   (B) न्यून ओळख पटवलेले
   (C) नेमकेपणाने ओळख पटवलेले
   (D) ओळख न पटवलेले

2. आर्थिक काल शृंखलाच्या प्रसंभाव्य गुणधर्मांचे विश्लेषण स्वत:हून करण्यासाठी उपयोगात आणलेल्या पद्धतीला ........................ म्हणतात.
   (A) घातफल सुरळीत पद्धत
   (B) एकेरी समीकरण प्रतिपगमन प्रतिमान
   (C) स्वयंप्रतीपगामी एकात्मीकरण सरळ सरासरी प्रतिमान (ARIMA)
   (D) सदिश स्वयंप्रतीपगामी प्रतिमान (VAR)

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



3. If a Durbin-Watson statistic takes a value close to zero, what will be the value of the first order auto-correlation coefficient ?
   (A) Close to zero
   (B) Close to plus one
   (C) Close to minus one
   (D) Close to either minus one or plus one

4. What will be properties of OLS estimator in the presence of multicollinearity ?
   (A) It will be consistent, unbiased and efficient
   (B) It will be consistent and unbiased but not efficient
   (C) It will be consistent but not unbiased
   (D) It will not be consistent

3. जर डर्बीन-वॉटसन प्रतिदर्शज शून्याच्या जवळचे मूल्य घेत असेल तर प्रथम कोटीचा स्वयं-संबंध गुणक कोणते मूल्य घेईल ?
   (A) शून्याच्या जवळचे
   (B) अधिक एकच्या (+1) जवळचे
   (C) उणे एकच्या (–1) जवळचे
   (D) उणे एकच्या किंवा अधिक एकच्या जवळचे

4. बहुविध एकरेषीयतेच्या उपस्थितीत ओ.एल.एस. आकलकाचे गुणधर्म कोणते ?
   (A) तो सुसंगत, निरभिनत व कार्यक्षम असेल
   (B) तो सुसंगत आणि निरभिनत असेल पण कार्यक्षम नसेल
   (C) तो सुसंगत असेल पण निरभिनत नसेल
   (D) तो सुसंगत नसेल

www.prepp.in

Prepp Your Personal Exams Guide



5. If we multiply both Y and X by 1000 and re-estimate the regression, the slope coefficient and its standard error will :

(A) Increase by 1000 times

(B) Decrease by 1000 times

(C) Remain same

(D) Increase by $\left(\frac{1}{1000}\right)$ times

5. समजा आपण Y आणि X या दोघांनाही 1000 या संख्येने गुणले आणि प्रतिपगमन प्राकक्लन पुन्हा केले, तर प्रवणता गुणांक आणि प्रमाण प्रमाद हे ........................ .

(A) 1000 पटीने वाढेल

(B) 1000 पटीने घटेल

(C) पूर्वी इतकेच राहील

(D) $\left(\frac{1}{1000}\right)$ पटीने वाढेल

6. The Samuelson-Hicks type trade cycle models will show instability as well as cyclical fluctuations only.

(A) Income expansion equation shows complex roots whose magnitudes are greater than one

(B) Income expansion equation shows complex roots whose magnitudes are less than one

(C) Income expansion equation shows real roots whose magnitudes are less than one

(D) Income expansion equation shows real roots whose magnitudes are more than one

6. सॅम्युलसन-हिक्स प्रकाराचे व्यापार चक्र प्रतिमान अस्थिरता तसेच चक्रीय बदल कोणत्या स्थितीत दर्शवेल ?

(A) उत्पन्न पसरण समीकरण जेथे संमिश्र मूळाचे परिमाण एकापेक्षा अधिक राहील

(B) उत्पन्न पसरण समीकरण जेथे संमिश्र मूळाचे परिमाण एकापेक्षा कमी राहील

(C) उत्पन्न पसरण समीकरण जेथे वास्तविक मूळ परिमाण एकापेक्षा कमी राहील

(D) उत्पन्न पसरण समीकरण जेथे वास्तविक मूळ परिमाण एकापेक्षा जास्त राहील

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



7. When a monopolist is in a position to sell each separate unit of a commodity at a different price, it is the case of ............................ price discrimination.
   (A) Third degree
   (B) First degree
   (C) Second degree
   (D) General

8. Match the following :

**List I**

(*a*) Baumol
(*b*) Marris
(*c*) Cyert and March
(*d*) Marshall

**List II**

(*i*) Profit Maximisation
(*ii*) Sales Revenue Maximisation
(*iii*) Maximum satisfaction
(*iv*) Maximisation of growth rate

**Codes :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |

7. जेव्हा मक्तेदार वस्तूचा प्रत्येक नग निराळ्या किंमतीस विकू शकतो तेव्हा त्या स्थितीस ...................... मूल्यभेद असे म्हणतात.
   (A) तिसऱ्या श्रेणीचा
   (B) पहिल्या श्रेणीचा
   (C) दुसऱ्या श्रेणीचा
   (D) सर्वसाधारण

8. जोड्या लावा :

**सूची I**

(*a*) बाऊमोल
(*b*) मॅरिस
(*c*) सीअर्ट आणि मार्च
(*d*) मार्शल

**सूची II**

(*i*) नफा महत्तमीकरण
(*ii*) विक्री प्राप्ती महत्तमीकरण
(*iii*) महत्तम समाधान
(*iv*) वृद्धी दराचे महत्तमीकरण

**संकेतांक :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) | (*i*) |
| (B) | (*iv*) | (*ii*) | (*iii*) | (*i*) |
| (C) | (*iv*) | (*i*) | (*ii*) | (*iii*) |
| (D) | (*ii*) | (*iv*) | (*iii*) | (*i*) |

www.prepp.in



9. Equilibrium under excess capacity and monopolistic competition occurs where ............................... .

(A) Output is less than the one at which Average Total Cost is minimum

(B) Output is more than the one at which Average Total Cost is minimum

(C) Output is less than the one at which Average Total Cost is maximum

(D) Output is more than the one at which Average Total Cost is maximum

9. अतिरिक्त क्षमता आणि मक्तेदारीयुक्त स्पर्धेत तेथे समतोल निर्माण होतो जेथे ............... .

(A) किमान सरासरी एकूण खर्च पातळीवरील उत्पादनापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन कमी असते

(B) किमान सरासरी एकूण खर्च पातळीवरील उत्पादनापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन जास्त असते

(C) कमाल सरासरी एकूण खर्च पातळीवरील उत्पादनापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन कमी असते

(D) कमाल सरासरी एकूण खर्च पातळीवरील उत्पादनापेक्षा प्रत्यक्ष उत्पादन अधिक असते

www.prepp.in



10. In case the technical progress in the economy is positive, steady state growth rate in Solow growth model will be :

(A) Greater than population growth rate

(B) Smaller than population growth rate

(C) Equal to the population growth rate

(D) Equal to population growth rate minus the technical progress rate

11. Which one of the following is *not* a feature of customs union ?

(A) Abolition of Tariff

(B) Abolition of Quota

(C) Mobility of labour across boundaries

(D) Common External Tariff Policy

10. अर्थव्यवस्थेतील तांत्रिक प्रगती धनात्मक असेल तर सोलो अभिवृद्धी प्रतिमानात स्थिर अवस्था वृद्धी दर खालीलपैकी काय होईल ?

(A) लोकसंख्या वृद्धी दरापेक्षा अधिक

(B) लोकसंख्या वृद्धी दरापेक्षा कमी

(C) लोकसंख्या वृद्धी दरा बरोबर

(D) लोकसंख्या वृद्धी दर उणे तांत्रिक प्रगती दर

11. खालीलपैकी कोणते जकात संघाचे वैशिष्ट्य **नाही** ?

(A) प्रशुल्काचे निर्मूलन

(B) कोट्याचे निर्मूलन

(C) श्रमाची सीमापार गतिशीलता

(D) सामायिक बहिर्गत प्रशुल्क धोरण

www.prepp.in



12. The main reason for the fall of the Bretton Woods system was :

(A) difficulty in attaining simultaneous internal and external balance without discrete exchange rate adjustments

(B) difficulty in attaining external balance due to the strong and discrete exchange rate adjustment

(C) difficulty in attaining external balance without discrete exchange rate adjustments

(D) difficulty in attaining internal balance without discrete exchange rate adjustments

12. ब्रेटन वुडस् व्यवस्थेच्या ऱ्हासाचे मुख्य कारण .......................... हे होते.

(A) विविक्त विनिमय दर समायोजनाअभावी एकसामायिक अंतर्गत आणि बहिर्गत संतुलन प्राप्तीमध्ये येणारी बाधा

(B) प्रबल आणि विविक्त विनिमय दर समायोजनामुळे बहिर्गत संतुलन प्राप्तीत येणारी बाधा

(C) विविक्त विनिमय दर समायोजन विरहित बहिर्गत संतुलन प्राप्तीमध्ये येणारी बाधा

(D) विविक्त विनिमय दर समायोजन विरहित अंतर्गत संतुलन प्राप्तीमध्ये येणारी बाधा

www.prepp.in



13. An example of dynamic gain from Regional Trade Agreement is :

(A) Trade creation

(B) Trade diversion

(C) Increase in the rate of product innovation

(D) Improvement in Terms of Trade

14. Exchange rates quoted in foreign exchange transactions specifying a future transaction date one that even may be several years away are called as ............................ .

(A) Spot exchange rates

(B) Forward exchange rates

(C) Vehicle currency rates

(D) Futures and options

15. Assured profit is involved in ......... in the foreign exchange market.

(A) Hedging

(B) Arbitrage

(C) Speculation

(D) Bargaining

13. प्रादेशिक व्यापारातून उत्पन्न होणाऱ्या गतिशील लाभाचे एक उदाहरण म्हणजे :

(A) व्यापार निर्मिती

(B) व्यापार अपसरण

(C) वस्तु नवप्रवर्तनाच्या दरातील वाढ

(D) व्यापार शर्तीतील सुधारणा

14. परकीय विनिमय व्यवहारात नमूद केलेले भविष्य दिनांकीत विनिमय दर कि जे काही वर्षे दूर असतील त्यांना ............................ असे संबोधले जाते.

(A) हजर विनिमय दर

(B) वायदा विनिमय दर

(C) वाहन चलन दर

(D) वायदा आणि पर्याय

15. परकीय विनिमय बाजारात सुनिश्चित नफा ....................... बाबतीत अंतर्भूत असतो.

(A) बचावाच्या

(B) मूल्यांतर पणनाच्या

(C) सट्टेबाजीच्या

(D) सौद्याच्या

www.prepp.in



16. **Statement I :** The functioning of Public Distribution System of India is severely criticised.

**Statement II :** The leakages of foodgrains meant for Public Distribution System to the open market and supply of inferior grains in ration shops are the main reasons for worry.

**Codes :**

(A) Both the statements I and II are correct and statement II is one of the reasons for statement I

(B) Both the statements I and II are correct and statement II is the sole reason for statement I

(C) Both the statements I and II are correct but statement II is not the reason for statement I

(D) Statement I is correct but the statement II is incorrect

16. **विधान I :** भारताच्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर कठोरपणे टिका केली जाते.

**विधान II :** सार्वजनिक वितरण व्यवस्थे-करीताच्या धान्याची खूल्या बाजारात गळती आणि स्वस्त धान्य दुकानातील निकृष्ट दर्जाचा धान्य पुरवठा ही चिंतेची प्रमुख कारणे आहेत.

**संकेतांक :**

(A) विधान I आणि विधान II ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि विधान II हे विधान I चे कारण आहे

(B) विधान I आणि विधान II ही दोन्ही विधाने बरोबर आहेत आणि विधान II हे विधान I चे एकमेव कारण आहे

(C) विधान I आणि विधान II ही दोन्ही विधाने बरोबर आहेत परंतु विधान II हे विधान I चे कारण नाही

(D) विधान I बरोबर आहे परंतू विधान II चूक आहे

www.prepp.in



17. The minimum cereal consumption norm per month fixed for sustenance level by the Indian Council of Medical Research is ..... .

(A) 13.7 kg

(B) 12.6 kg

(C) 09.5 kg

(D) 11.6 kg

18. By and large, the profitability of Indian agriculture ................ .

(A) Increases with the size of holding

(B) Decreases with the size of holding

(C) Is independent of the size of holding

(D) Initially decreases and then eventually increased

17. शाश्वत जीवनमान पातळीकरिता इंडियन कौन्सील ऑफ मेडिकल रिसर्च द्वारा दरमहा किमान तृणधान्य सेवनाचा निर्धारित निकष ........... आहे.

(A) 13.7 किलो

(B) 12.6 किलो

(C) 09.5 किलो

(D) 11.6 किलो

18. सर्वसाधारणपणे भारतीय कृषीची नफा-क्षमता ................... .

(A) धारणक्षेत्राच्या आकारमानाबरोबर वाढते

(B) धारणक्षेत्राच्या आकारमानाबरोबर घटते

(C) धारणक्षेत्राच्या आकारमानापासून स्वतंत्र आहे

(D) सुरुवातीस घटते व कालांतराने वाढते

www.prepp.in



19. The Agmark seal for the farm products is to ensure .................. .

(A) long life of product

(B) Reasonable price

(C) Good packaging

(D) Grading and standardisation

20. The phenomenon of a 'U' shaped relationship between labour attachment and agricultural development is indicative of ..... .

(A) after an initial decline as agriculture develops it starts to increase at later stages

(B) after an initial increase as agriculture develops it starts to decline at later stages

(C) after an initial decline as agriculture develops it remains at low level at later stages

(D) after an initial increase as agriculture develops it remains at high level at later stages

19. कृती वस्तूंना दिलेला 'ॲगमार्क' चा शिक्का म्हणजे .......................... ची खामी असते.

(A) उत्पादनाचा दीर्घकाळ टिकाऊपणा

(B) रास्त किंमत

(C) उत्तम पॅकेजींग

(D) प्रतवारी आणि समदर्जा

20. श्रम सल्लग्नता आणि कृषी विकासासंदर्भात इंग्रजी 'U' आकाराच्या परिस्थितीजन्य सहसंबंधातून . .......................... असा बोध होतो.

(A) सुरुवातीला जसा कृषी विकास होतो तशी यात घट होते आणि त्यानंतरच्या टप्प्यावर यात पुन्हा वाढ होते

(B) सुरुवातीला जसा कृषी विकास होतो तशी यात वाढ होते आणि त्यानंतरच्या टप्प्यावर यात पुन्हा घट होते

(C) सुरुवातीला जसा कृषी विकास होतो तशी यात घट होते आणि त्यानंतरच्या टप्प्यावर तसेच कायम खालच्या पातळीवर राहते

(D) सुरुवातीला जसा कृषी विकास होतो तशी यात वाढ होते आणि त्यानंतरच्या टप्प्यावर तसेच वरच्या पातळीवर कायम राहते

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



21. During the year 2014-15, the sectoral distribution of primary and tertiary sectors in India's GDP was approximately ................................ respectively.

(A) 30% 40%

(B) 20% 60%

(C) 8% 53%

(D) 16% 53%

22. In the context of social development, GER suggests :

(A) Gross Enrolment Ratio

(B) Gross Entitlement Ratio

(C) General Enrolment Rate

(D) General Entitlement Rate

21. 2014-15 यावर्षी प्राथमिक आणि तृतीय सेवा क्षेत्रांचा हिस्सा भारताच्या देशीय उत्पादिता-मध्ये अनुक्रमे ................, ................ होता.

(A) 30 टक्के 40 टक्के

(B) 20 टक्के 60 टक्के

(C) 8 टक्के 53 टक्के

(D) 16 टक्के 53 टक्के

22. सामाजिक विकास संदर्भात GER चा अर्थ ...................... असा सूचित होतो.

(A) स्थूल नोंदणी गुणोत्तर

(B) स्थूल अधिकृत हक्क गुणोत्तर

(C) साधारण नोंदणी गुणोत्तर

(D) साधारण अधिकृत हक्क गुणोत्तर

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



23. What can you say about the following statements ?

**Statement I :** The Green Revolution in India led to rapid growth in the production of wheat and maize.

**Statement II :** The Green Revolution led to wide disparities of income in rural India.

**Codes :**

(A) Statement (I) is correct and Statement (II) is incorrect

(B) Both Statement (I) and Statement (II) are incorrect

(C) Statement (I) is incorrect and Statement (II) is correct

(D) Both Statement (I) and Statement (II) are correct

23. खालील विधानाबाबत तुम्ही काय म्हणू शकता ?

**विधान I :** भारतातील हरित क्रांतीमुळे गहू आणि भाताच्या उत्पादनात जलद वृद्धी झाली.

**विधान II :** हरित क्रांतीमुळे भारतातील ग्रामीण उत्पन्नात तीव्र विषमता निर्माण झाली.

**संकेतांक :**

(A) विधान (I) बरोबर आहे आणि विधान (II) चूक आहे

(B) विधान (I) आणि विधान (II) ही दोन्ही विधाने चूक आहेत

(C) विधान (I) चूक आहे आणि विधान (II) बरोबर आहे

(D) विधान (I) आणि विधान (II) ही दोन्ही विधाने बरोबर आहेत

www.prepp.in



24. In India, during the planning period, the structural change is taking place rather slowly, mainly due to :

(A) Slow annual growth rate of tertiary sector

(B) Slow annual growth rate of manufacturing sector

(C) Stagnant growth of tertiary sector

(D) Negative annual growth rate of agricultural sector

25. Fill in the blanks :

% of Indian Population in 0-6 age group.

Census of India

| | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|
| | ? | ? | ? |
| (A) | 19.0 | 18.15 | 17.94 |
| (B) | 18.64 | 16.15 | 15.12 |
| (C) | 17.94 | 15.93 | 13.12 |
| (D) | 18.15 | 16.50 | 15.00 |

24. नियोजन काळात भारतामध्ये संरचनात्मक बदल काहीसा सावकाश होत आहे, यामागील मुख्य कारण म्हणजे ............................ .

(A) सेवा क्षेत्राच्या वार्षिक अभिवृद्धीचा धीमा दर

(B) वस्तुनिर्माण क्षेत्राच्या वार्षिक अभिवृद्धीचा धीमा दर

(C) सेवा क्षेत्राच्या वाढीचा कुंठित दर

(D) शेती क्षेत्राच्या वार्षिक अभिवृद्धीचा उणे दर

25. गाळलेल्या जागा भरा :

0–6 या वयोगटातील लोकसंख्येचे टक्केवारी प्रमाण :

भारताची शिरगणती

| | 1991 | 2001 | 2011 |
|---|---|---|---|
| | ? | ? | ? |
| (A) | 19.0 | 18.15 | 17.94 |
| (B) | 18.64 | 16.15 | 15.12 |
| (C) | 17.94 | 15.93 | 13.12 |
| (D) | 18.15 | 16.50 | 15.00 |

www.prepp.in



26. What can you say of the following statements ?

**Statement I :** In the first stage of production, the mp of the variable factor is negative.

**Statement II :** In the third stage of production, the mp of the fixed factor is negative.

**Codes :**

(A) Both Statement (I) and Statement (II) are correct

(B) Statement (I) is correct and Statement (II) is incorrect

(C) Both Statement (I) and Statement (II) are incorrect

(D) Statement (I) is incorrect and Statement (II) is correct

26. पुढील विधानांबाबत तुम्ही काय सांगाल ?

**विधान I :** उत्पादनाच्या पहिल्या टप्प्यात 'एमपी'चा अस्थिर गुणकपद नकारात्मक आहे.

**विधान II :** उत्पादनाच्या तिसऱ्या टप्प्यात 'एमपी' चा स्थिर गुणकपद नकारात्मक आहे.

**संकेतांक :**

(A) विधान (I) आणि विधान (II) ही दोन्ही बरोबर आहेत

(B) विधान (I) बरोबर व विधान (II) चूक आहे

(C) विधान (I) आणि विधान (II) ही दोन्ही चूक आहेत

(D) विधान (I) चूक व विधान (II) बरोबर आहे

www.prepp.in



27. What can you say about the following statements ?

**Statement I :** In a competitive market, P > MC and in a monopoly market P = MC

**Statement II :** Since a monopolist is the sole operator in the market, he is always bound to make huge profits.

**Codes :**

(A) Both Statement (I) and Statement (II) are correct

(B) Both Statement (I) and Statement (II) are incorrect

(C) Statement (I) is incorrect and Statement (II) is correct

(D) Statement (I) is correct and Statement (II) is incorrect

27. पुढील विधानांबाबत तुम्ही काय म्हणतात ?

**विधान I :** स्पर्धात्मक बाजारात किंमत > सीख व मक्तेदारी बाजारात किंमत = सीख

**विधान II :** मक्तेदार, हा बाजारातील एकमेव विक्रेता असल्याने त्याला नेहमीच उच्च नफा मिळत असतो.

**संकेतांक :**

(A) विधान (I) व विधान (II) ही दोन्ही बरोबर आहेत

(B) विधान (I) व विधान (II) ही दोन्ही चूक आहेत

(C) विधान (I) चूक व विधान (II) बरोबर आहे

(D) विधान (I) बरोबर व विधान (II) चूक आहे

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



28. Baumol's postulation of oligopolistic firm's aim of sales revenue maximisation is subjected to ....... .

(A) Minimum loss constraint

(B) Minimum profit constraint

(C) Maximum profit constraint

(D) Maximum loss constraint

29. Identify the *incorrect* statement :

(1) In perfect competition market, price elasticity for the product is infinite

(2) In monopoly market, cross elasticity of demand for commodities is near zero

(3) In the monopoly market, entry into the market is easily possible

(4) In perfect competition market entry into the market is very easy

**Codes :**

(A) (4)

(B) (1)

(C) (2)

(D) (3)

28. अल्पजनाधिकारी संस्थेचा विक्री उत्पन्न महत्तमिकरणाचा बॉमूलचा दृष्टिकोण .......... शी संबंधित आहे.

(A) किमान तोटा मर्यादा

(B) किमान नफा मर्यादा

(C) महत्तम नफा मर्यादा

(D) महत्तम तोटा मर्यादा

29. खालीलपैकी **चुकीचे** विधान ओळखा :

(1) पूर्ण स्पर्धेच्या बाजारात वस्तूच्या मागणीची लवचिकता अनंत इतकी असते

(2) मक्तेदारी बाजारात वस्तूच्या मागणीची छेदक लवचिकता जवळजवळ शून्य इतकी असते

(3) मक्तेदारी बाजारात प्रवेश करणे सहज शक्य असते

(4) पूर्ण स्पर्धेच्या बाजारात प्रवेश करणे अतिशय सोपे असते

**संकेतांक :**

(A) (4)

(B) (1)

(C) (2)

(D) (3)

www.prepp.in



30. The kinky oligopoly demand curve theory was put forward by ........... in ....................... .

(A) Paul Sweezy 1939

(B) Paul Samuelson 1948

(C) Pigou 1931

(D) Paul Sweezy 1931

31. Select the right answer from options (A) to (D) as below :

**Assertion (S) :** A shift in aggregate demand curve due to expansionery fiscal policy always increases aggregate output in the complete Keynesian model.

**Reasoning (R) :** This happens because aggregate supply curve is always upward sloping in complete Keynesian model.

**Codes :**

(A) (S) is correct and (R) is correct

(B) (S) is incorrect and (R) is correct

(C) (S) is correct and (R) is incorrect

(D) (S) is incorrect and (R) is incorrect

30. अल्पविक्रेताधिकार बाजाराचा बाकदार मागणीवक्र .................. याने ..................साली मांडला.

(A) पॉल स्वीझी 1939

(B) पॉल सॅम्युअलसन 1948

(C) पिगू 1931

(D) पॉल स्वीझी 1931

31. खालील (A) ते (D) या पर्यायी उत्तरांपैकी बरोबर उत्तराची निवड करा :

**प्रतिपादन (S) :** विस्तारी राजकोषीय धोरणामुळे संपूर्ण केन्सप्रणीत प्रतिमानात सकल उत्पादन वाढीस लागते त्यामुळे सकल मागणीवक्र सरकतो.

**युक्तिवाद (R) :** हे घडते, कारण सकल पुरवठावक्र संपूर्ण केन्सप्रणीत प्रतिमानात चढता असतो.

**संकेतांक :**

(A) (S) हे बरोबर आणि (R) हे बरोबर

(B) (S) हे चूक आणि (R) हे बरोबर

(C) (S) हे बरोबर आणि (R) हे चूक

(D) (S) हे चूक आणि (R) हे चूक

www.prepp.in

Prepp
Your Personal Exams Guide



32. Choose the right answer from the options (A) to (D) given below :

**Assertion (S) :** In the classical model, no equilibrium other than full-employment is possible.

**Reasoning (R) :** This is ensured by a negatively sloping AD curve and a vertical AS curve.

**Codes :**

(A) (S) is correct but (R) is incorrect

(B) Both (S) and (R) are correct

(C) Both (S) and (R) are incorrect

(D) (S) is incorrect and (R) is correct

33. In Mundell-Fleming open economy macro-economic model, balance of payment curve is horizontal when :

(A) Capital mobility is imperfect

(B) Capital mobility is perfect

(C) Capital mobility is prohibited

(D) Capital mobility is fixed quantity

32. खालील (A) ते (D) या पर्यायामधून योग्य उत्तराची निवड करा :

**प्रतिपादन (S)** : अभिमत संप्रदाय प्रतिमानात, पूर्ण रोजगाराव्यतिरिक्त समतोल साध्य होणे शक्य होत नाही.

**युक्तिवाद (R)** : याची खात्री प्रवणता ऋणात्मक AD वक्राने आणि क्षितिजलंब AS वक्राच्या साहाय्याने होते.

**संकेतांक :**

(A) (S) बरोबर परंतु (R) हे चूक

(B) दोन्ही (S) आणि (R) बरोबर

(C) दोन्ही (S) आणि (R) चूक

(D) (S) चूक परंतु (R) हे बरोबर

33. मुंडेल-फ्लेमिंग खुल्या अर्थव्यवस्थेच्या समष्टि आर्थिक प्रतिमानात आंतरराष्ट्रीय व्यवहार ताळेबंद वक्र समस्तरीय राहील जेंव्हा ................ .

